प्रहार

■ नोंदणी क्रमांक : एमएएचएमएआर/२००५/१८६८१ ■ मुंबई ■ वर्ष ४ ■ अंक १६६ ■ पाने १६ (मुंबई प्रहारसह) ■ ₹ २.५०

# सांगानेरिया यांना जेजेटी विद्यापीठाची डॉक्टरेट

मुंबई (प्रतिनिधी)

'थोडी यात्रा, थोडे कागज', 'ज्योती की अलोक यात्रा', 'लोहित के मानसपुत्र' आदी पुस्तकांमुळे देशविदेशात आपली ख्याती निर्माण करणारे ज्येष्ठ साहित्यिक सांबरमल सांगानेरिया यांना राजस्थान येथील झुंझुनूच्या जगदीशप्रसाद झांबरमल टीबडेवाला विद्यापीठाच्या डी. लिट्. पदवीने सन्मानित करण्यात येणार आहे. राजस्थान आणि मुंबईत शिक्षणासाठी विविध दालन निर्माण करणाऱ्या राजस्थानी सेवा संघाच्या शिक्षण संस्थेला ५० वर्षे पूर्ण होत असून, यानिमित्ताने मुंबई येत्या ६ एप्रिल रोजी विलेपार्ले येथील भाईदास सभागृहात होणाऱ्या एका कार्यक्रमात सांगानेरिया व जेजेटी विद्यापीठाचे कुलगुरू विनोद टीबडेवाला यांनाही डी. लिटच्या पदवी दिली जाईल.

ज्येष्ठ साहित्यिक सांगानेरिया यांनी आपले आयुष्य ईशान्य भारतातील प्रांतातील लोकांमध्ये जाऊन भ्रमंती करण्यासाठी घालवले. गुवाहटी येथून प्रकाशित होणाऱ्या 'जागृत' या साप्ताहिकाचे ते संपादकही आहेत. त्यांनी लिहिलेल्या 'ज्योती की अलोक यात्रा' या दुसऱ्या पुस्तकाला महाराष्ट्र राज्याच्या हिंदी साहित्य अकादमीचा 'मुन्शी प्रेमचंद पुरस्कार' प्राप्त झाला आहे. त्यांचे 'लोहित के मानसपुत्र' हे पुस्तक भारतीय ज्ञानपिठाने प्रकाशित केले आहे.

मुंबईतील सर्वसामान्य लोकांना शिक्षण मिळावे यासाठी ५० वर्षांपूर्वी या राजस्थानी सेवा संघाची स्थापना करण्यात आली. मुंबईत जेटीबी नगर आणि इतर उपनगरात संघाच्या शालेय शिक्षणापासून महाविद्यालयीन व पदव्यूत्तर स्तरावरील शैक्षणिक संस्था आहेत. सध्या या संस्थेत संशोधन आणि उद्योगविषय अभ्यासक्रमांची मोठी संख्या आहे. याच संघाच्या अंतर्गत राजस्थानच्या झुंझुनू येथे जेजेटी विद्यपीठ सुरू असून सध्या या विद्यापीठात दोन हजाराहून अधिक विद्यार्थी विविध विषयांवर संशोधनाचे कार्य करत आहेत. ■